RNI No. MAHBIL /2009/31732

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

**वर्ष ७, अंक २८] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर ४-१०, २०२१/ कार्तिक १३-१९, शके १९४३ [पृष्ठे ११, किंमत : रुपये ९.००**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ नोव्हेंबर २०२१.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक मनासे-२०१९/प्र.क्र.४५१/सेवा-४.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत:—

१. या नियमांस, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) (सुधारणा) नियम, २०२१ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य नियम" असा केला आहे) याच्या नियम ३ च्या पोट-नियम (१) मध्ये,—

(क) खंड (ए) मधील "भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक" या मजकुरानंतर "किंवा संचालक, लेखा व कोषागारे" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल आणि तो नेहमीसाठीच जादा दाखल करण्यात आला असे मानण्यात येईल;

(ख) खंड (डी) मध्ये,—

(एक) उप-खंड (एक) वगळण्यात येईल;

(दोन) उप-खंड (दोन) मधील "व उपकोषागार" हा मजकूर वगळण्यात येईल.

३. मुख्य नियमांच्या नियम ५ मध्ये,—

(क) पोट-नियम (१) मधील "एक-तृतीयांश" या मजकुराऐवजी "चाळीस टक्के" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो दिनांक २७ फेब्रुवारी २००९ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल;

(ख) पोट-नियम (१) नंतर खालील टीप समाविष्ट करण्यात येईल –

**टीप.–** तथापि, ही हक्कदारी ऐच्छिक स्वरुपाची असेल.

(ग) पोट -नियम (२) मधील "एक-तृतीयांश" या मजकुराऐवजी "चाळीस टक्के" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो दिनांक २७ फेब्रुवारी २००९ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

४. मुख्य नियमांच्या नियम ८ नंतर पुढील नियम, जादा दाखल करण्यात येईल आणि तो दिनांक ३० मे १९८८ पासून जादा दाखल करण्यात आला असल्याचे समजण्यात येईलः

(ए) "८अ. निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत भागाची पुनःस्थापना करणे—

(१) (ए) ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्याने दिनांक १ एप्रिल १९८५ रोजी किंवा त्यानंतर, आपल्या निवृत्तिवेतनाचा भाग अंशराशीकृत केला असेल अशा शासकीय कर्मचाऱ्याच्याबाबतीत, त्यांचा अंशराशीकृत केलेला भाग त्याच्या सेवानिवृत्तीस पंधरा वर्षे पूर्ण झाल्यानंतर, पुन्हा देण्यात येईल.

(बी) शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या निवृत्तिवेतनाचा भाग अंशराशीकृत केला असेल आणि त्यास पंधरा वर्षांचा कालावधी दि.१ एप्रिल १९८५ पूर्वीच पूर्ण झालेला असेल, अशा प्रकरणी निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग दिनांक १ एप्रिल १९८५ पासून पुनः देण्यात येईल.

(२) उपरोक्त पोट-नियम (१) अन्वये निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत केलेला भाग पुनः दिला जाण्यास पात्र असणारा प्रत्येक निवृत्तिवेतनधारक नमुना-एफ मधील अर्ज, यथोचितरीत्या पूर्ण भरुन निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकरणाकडे सादर करील.

(३) निवृत्तिवेतनधारकाने दिनांक १ एप्रिल १९८५ रोजी किंवा त्यानंतर निवृत्तीच्या तारखेपासून पंधरा वर्षे पूर्ण केली असतील आणि त्यानंतर त्याचा मृत्यु झाल्यास, त्याचा कायदेशीर वारस देखील, दिनांक १ एप्रिल १९८५ पासून किंवा निवृत्तीच्या तारखेपासून पंधरा वर्षे ज्या तारखेला पूर्ण होतील, यापैकी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून, निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूच्या तारखेपर्यंतची थकबाकी मिळण्यास हक्कदार असतील. या प्रयोजनार्थ, कायदेशीर वारसांना देखील निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकरणाकडे अर्ज करता येईल.

(४) अंशराशीकृत केलेल्या भागाची माहिती निवृत्तिवेतन प्रदान आदेशात अंतर्भूत नसेल अशा बाबतीत निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकरण, ती माहिती, ज्या लेखा अधिकाऱ्याने निवृत्तिवेतन प्रदान आदेश काढले होते त्या लेखा अधिकाऱ्याकडून प्राप्त करून घेईल.

(५) निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकरण, ज्या लेखा अधिकाऱ्याने निवृत्तिवेतन प्रदान आदेश काढला असेल त्या लेखाधिकाऱ्यास, नमुना जी मध्ये त्याबाबतच्या अचूकतेची पडताळणी करण्यासाठी प्रत्येक निवृत्तिवेतनाच्या प्रकरणाचा संपूर्ण तपशील पुन्हा दिलेल्या निवृत्तिवेतनाच्या रकमेसह कळवील.

(६) ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामध्ये, स्वायत्त संस्थांमध्ये, स्थानिक संस्था इत्यादीमध्ये सामावून घेतले असेल आणि निवृत्तिवेतनाच्या एक-तृतीयांश भागाचे अंशराशीकृत मूल्य, तसेच निवृत्तिवेतनाच्या एक-तृतीयांश भागाचे अंशराशीकरण केल्यानंतर उर्वरित निवृत्तिवेतनाच्या रकमेच्या अंशराशीकृत मूल्याइतके अंतिम लाभ स्वीकारले असतील / स्वीकारण्याचा विकल्प दिलेला असेल ते राज्य शासकीय कर्मचारी निवृत्तिवेतनधारक असणे बंद झाल्यामुळे ते या तरतुदींअन्वये कोणताही लाभ मिळण्यास हक्कदार असणार नाहीत.";

(ब) अशा रितीने जादा दाखल केलेल्या नियम ८अ मध्ये,—

(एक) पोट-नियम (१) मधील, खंड (बी) नंतर, खालील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल आणि ते दि. २८ मार्च १९९० पासून समाविष्ट केले असल्याचे मानण्यात येईलः—

“**स्पष्टीकरण.—** शासकीय कर्मचाऱ्याने त्यांच्या सेवानिवृत्तिच्या दिनांकानंतर निवृत्तिवेतनाचा भाग अंशराशीकृत केला असेल अशा बाबतीत, त्याचा निवृत्तिवेतनाचा भाग, ज्या दिनांकाला अंशराशीकृत केलेला असेल त्या दिनांकापासून पंधरा वर्षे पूर्ण झाल्यानंतर पुनः देण्यात येईल.”;

(दोन) पोट-नियम (२), वगळण्यात येईल आणि तो दि.२ जुलै २०१५ पासून वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल;

(तीन) पोट-नियम (६), वगळण्यात येईल आणि तो दि.२६ मे १९९७ पासून वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

५. मुख्य नियमाच्या नियम ८अ नंतर, पुढील नियम जादा दाखल करण्यात येईल आणि तो दि.२६ मे १९९७ पासुन जादा दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईलः

“८ब. सार्वजनिक क्षेत्र उपक्रमामध्ये किंवा स्वायत्त संस्थांमध्ये किंवा स्थानिक संस्थांमध्ये स्वतःला सामावून घेतल्यानंतर, एकरकमी ठोक रक्कम स्वीकारली आहे अशा शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, पुनः दिलेल्या निवृत्तिवेतनाच्या एक-तृतीयांश इतक्या अंशराशीकृत भागाची सुधारणा करण्याबाबत. - राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सार्वजनिक क्षेत्र उपक्रमामध्ये किंवा स्वायत्त संस्थांमध्ये किंवा स्थानिक संस्थांमध्ये, स्वतःला सामावून घेतल्यानंतर, एकरकमी ठोक रक्कम स्वीकारलेल्या कर्मचाऱ्यांच्या पुनः दिलेल्या निवृत्तिवेतनाच्या एक-तृतीयांश इतक्या भागाच्या रकमेतील सुधारणा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्णयानुसार विनियमित करण्यात येतील.”

६. मुख्य नियमांच्या नियम ९ च्या पोट-नियम (३) मध्ये,—

(एक) खंड (ए), मध्ये जेथेजेथे “शंभर रुपयांहून” हा मजकूर आला आहे तेथेतेथे त्याऐवजी “मूळ निवृत्तिवेतनाच्या दहा टक्क्यांहून” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) खंड (बी), मध्ये ज्या ज्या ठिकाणी “शंभर रुपये” हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला आहे त्या त्या ठिकाणी त्याऐवजी “मूळ निवृत्तिवेतनाच्या दहा टक्के” त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

७. मुख्य नियमांच्या नियम १० मध्ये,—

(क) विद्यमान परंतुकापूर्वी खालील परंतुक समाविष्ट करण्यात येईल आणि ते दि. ११ मार्च १९९४ पासून समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईलः

“परंतु, जर निवृत्तिवेतनधारकाने, निवृत्तिवेतनाच्या त्याच्या अर्जात, त्याच्या अंतिम निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची रक्कम विनिर्दिष्टरीत्या नमूद केली असेल आणि शासनाच्या निर्णयानुसार त्याच्या निवृत्तिवेतनात सुधारणा करण्यात आली असेल आणि भूतलक्षी प्रभावाने सुधारणा करण्यात आली असेल तर, निवृत्तिवेतनधारकाने इच्छा प्रदर्शित केली असेल तर, तो सुधारित अंतिम निवृत्तिवेतनाच्या एक-तृतीयांश इतक्या मर्यादेपर्यंत त्याच्या अंतिम निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या रकमेत सुधारणा व वाढ करण्यास तो पात्र राहील.”;

(ख) अशा प्रकारे जादा दाखल केलेल्या परंतुकामध्ये “एक-तृतीयांश” या मजकुराऐवजी “चाळीस टक्के” हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो दि.२७ फेब्रुवारी २००९ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल;

(ग) अशा प्रकारे समाविष्ट केलेल्या परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईलः —

“परंतु आणखी असे की, सुधारीत वेतन आयोगाच्या आदेशानुसार, शासनाने, भूतलक्षी प्रभावाने, वेतनश्रेणीत बदल केला असेल आणि निवृत्तिवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली असेल तर, निवृत्तिवेतनधारकास, अंशराशीकरणाच्या फरकाच्या रक्कमेचा पर्याय स्वीकारता येईल, आणि शासनाने काढलेल्या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, त्यास, त्यासाठी संबंधित प्राधिकाऱ्याकडे अर्ज सादर करता येईल. जर निवृत्तिवेतनधारक, फरकाच्या रकमेसाठी अर्ज करीत नसेल किंवा तो पर्याय स्वीकारत नसेल तर, तो, सुधारित अंशराशीकरणासाठी इच्छुक नाही असे गृहित धरण्यात येईल.” .

(घ) विद्यमान परंतुकामध्ये,-

(एक) “मात्र” या मजकुराऐवजी “परंतु आणखी असे की” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) ज्या ज्या ठिकाणी “शंभर रुपये” हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला आहे त्या त्या ठिकाणी त्याऐवजी “मूळ निवृत्तिवेतनाच्या दहा टक्के” त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

८. मुख्य नियमांच्या नियम १३ मधील,—

(क) पोट-नियम (२) येथे दुसऱ्या ओळीत “त्याचा” या मजकुरानंतर “सदर” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-नियम (३) मध्ये “तारखेपूर्वी” या मजकुराऐवजी “तारखेपर्यंत” हा मजकुर दाखल करण्यात येईल;

(ग) पोट-नियम (३) मध्ये परंतुकातील-

(ए) खंड (सी) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल आणि तो दिनांक ३ मार्च १९९० पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईलः-

“(सी) खंड (बी) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीनंतर प्राप्त झालेला निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाचा असा कोणताही अर्ज, तो वेळेवर प्राप्त झाला नाही या कारणावरुन फेटाळण्यात येणार नाही आणि जर निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाचा असा अर्ज, शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी कार्यालय प्रमुखास प्राप्त झाला असेल तर, असे निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण त्याच्या सेवानिवृत्तीच्या पुढच्या दिवशी निश्चित होईल.”.

(बी) खंड (बी) व वरीलप्रमाणे दाखल करण्यात आलेला खंड (सी) वगळण्यात येईल.

९. मुख्य नियमांच्या नियम २०, मधील पोट-नियम (१) च्या खंड (बी) मधील “त्याला” या मजकुराऐवजी “लेखा परीक्षा अधिकाऱ्याला” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१०. मुख्य नियमांच्या नियम २२, मध्ये पोट-नियम (१) च्या खंड (बी) मधील “शंभर रुपयांहून” या मजकुराऐवजी “मूळ निवृत्तिवेतनाच्या दहा टक्क्यांहून” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

११. मुख्य नियमांच्या नियम ३१, मध्ये पोट-नियम (१) मधील परंतुकामध्ये जेथे “शंभर रुपया” हा मजकुर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह ज्या ज्या ठिकाणी आला आहे, त्याऐवजी तिथे “मूळ निवृत्तिवेतनाच्या दहा टक्के” हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

१२. मुख्य नियमासोबत जोडलेल्या नमुना - ए मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे,

(क) भाग-एक मध्ये,

(एक) अनुक्रमांक ११ मध्ये,

(क) खंड (ए) मधील “/ उपकोषागार” व “/ उपकोषागाराचे” हे मजकूर वगळण्यात येतील;

(ख) खंड (बी) वगळण्यात येईल;

(दोन) टीप मधील “एकतृतीयांश” या मजकुराऐवजी “चाळीस टक्के” मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो दिनांक २७ फेब्रुवारी २००९ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल;

(ख) भाग तीन मध्ये परिच्छेद ४ मधील “२६६” हा मजकूर वगळयात येईल.

१३. मुख्य नियमासोबत जोडलेल्या नमुना - बी मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे,—

(क) शिर्षकाखालील कंसामधील मजकूर वगळण्यात येईल;

(ख) भाग-एक मध्ये,

(एक) अनुक्रमांक ८ मध्ये, -

(क) खंड (ए) मधील “/ उपकोषागार” व “/ उपकोषागाराचे” हे मजकूर वगळण्यात येतील;

(ख) खंड (बी) वगळण्यात येईल;

(दोन) टीप मधील "एकतृतीयांश" या मजकुराऐवजी "चाळीस टक्के" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो दि. २७ फेब्रुवारी २००९ पासुन दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल;

(ग) भाग तीन येथील परिच्छेद ४ मध्ये "२६६" हा मजकूर वगळण्यात येईल.

१४. मुख्य नियमाना जोडलेल्या नमुना - सी मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे,

(क) भाग-एक मध्ये,

(एक) अनुक्रमांक ११ मध्ये, -

(क) खंड (ए) मधील "/ उपकोषागार" व "/ उपकोषागाराचे" हे मजकूर वगळण्यात येतील;

(ख) खंड (बी) वगळण्यात येईल;

(दोन) टीप मधील "एकतृतीयांश" या मजकुराऐवजी "चाळीस टक्के" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो दिनांक २७ फेब्रुवारी २००९ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल;

(ख) भाग चार मध्ये, अनुक्रमांक ८ मधील, "२६६-निवृत्तिवेतने व इतर सेवानिवृत्ति लाभ-बी-निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य" या मजकुराऐवजी, "येथे योग्य ते लेखाशीर्ष नमूद करावे" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१५. मुख्य नियमास जोडलेला नमुना – एफ दिनांक २ जुलै २०१५ पासून वगळण्यात येईल.

१६. नमुना एफ नंतर, पुढील नमुना जादा दाखल करण्यात येईल आणि तो दिनांक १ एप्रिल १९८५ पासून जादा दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :–

**"नमुना—जी**

[ नियम ८अ(५) पहा ) ]

निवृत्तिवेतन संवितरण करणाऱ्या प्राधिकाऱ्याने अंशराशीकृत भागाच्या पुनःस्थापनेच्याबाबतीत निवृत्तिवेतन प्रदान आदेश निर्गमित करणाऱ्या प्राधिकाऱ्यास द्यावयाच्या सूचनेचा नमुना.

(निवृत्तिवेतन संवितरण करणाऱ्या प्राधिकाऱ्याचा तपशील)

१. निवृत्तिवेतनधारकाचे नाव :..............................................

२. सेवानिवृत्तीचा दिनांक :..............................................

३. निवृत्तिवेतनाच्या प्रदानाचा आदेश क्रमांक :..............................................

४. मूळ निवृत्तिवेतनाची रक्कम :..............................................

५. निवृत्तिवेतनाची अंशराशीकृत रक्कम :..............................................

६. पुनःस्थापित केलेली निवृत्तिवेतनाची रक्कम :..............................................

७. पुनःस्थापित करण्याचा प्रत्यक्ष दिनांक :..............................................

८. पुनःस्थापित केल्यानंतर मिळणाऱ्या निवृत्तिवेतनाची रक्कम :..............................................

९. अन्य अभिप्राय, कोणतेही असल्यास :..............................................

(कार्यालयाच्या प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/
जिल्हा कोषागार अधिकारी.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-१), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-२), महाराष्ट्र, नागपूर.".

१७. मुख्य नियमाच्या विद्यमान तक्त्याला "तक्ता-एक" असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि तक्ता-एक नंतर पुढील तक्ता जादा दाखल करण्यात येईल :–

**"तक्ता-दोन**

[ नियम ८ (१); २६ (७); २८ (५) आणि २९ (१) व (२) पहा ]
(दि.२७ फेब्रुवारी २००९ पासून लागू)
प्रतिवर्षी एक रुपया निवृत्तिवेतनाकरिता अंशराशीकरण मूल्य

सूत्र-मूळ निवृत्तिवेतन x ४० टक्के x १२ x शासकीय कर्मचाऱ्याच्या मूळ अर्जाच्या दिनांकावर आधारीत पुढील जन्मदिनी होणाऱ्या वयाकरिताचे अंशराशीकरण मूल्य.

| पुढील जन्मदिनी होणारे वय | वर्ष खरेदीच्या संख्येच्या स्वरुपात दर्शविलेले अंशराशीकरण मूल्य | पुढील जन्मदिनी होणारे वय | वर्ष खरेदीच्या संख्येच्या स्वरुपात दर्शविलेले अंशराशीकरण मूल्य | पुढील जन्मदिनी होणारे वय | वर्ष खरेदीच्या संख्येच्या स्वरुपात दर्शविलेले अंशराशीकरण मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| २० | ९.१९ | ४१ | ९.०७५ | ६२ | ८.०९३ |
| २१ | ९.१८७ | ४२ | ९.०५९ | ६३ | ७.९८२ |
| २२ | ९.१८६ | ४३ | ९.०४० | ६४ | ७.८६२ |
| २३ | ९.१८५ | ४४ | ९.०१९ | ६५ | ७.७३१ |
| २४ | ९.१८४ | ४५ | ८.९९६ | ६६ | ७.५९१ |
| २५ | ९.१८३ | ४६ | ८.९७१ | ६७ | ७.४३१ |
| २६ | ९.१८२ | ४७ | ८.९४३ | ६८ | ७.२६२ |
| २७ | ९.१८० | ४८ | ८.९१३ | ६९ | ७.०८३ |
| २८ | ९.१७८ | ४९ | ८.८८१ | ७० | ६.८९७ |
| २९ | ९.१७६ | ५० | ८.८४६ | ७१ | ६.७०३ |
| ३० | ९.१७३ | ५१ | ८.८०८ | ७२ | ६.५०२ |
| ३१ | ९.१६९ | ५२ | ८.७०८ | ७३ | ६.२९६ |
| ३२ | ९.१६४ | ५३ | ८.७२४ | ७४ | ६.०८५ |
| ३३ | ९.१५९ | ५४ | ८.६७८ | ७५ | ५.८७२ |
| ३४ | ९.१५२ | ५५ | ८.६२७ | ७६ | ५.०५७ |
| ३५ | ९.१४५ | ५६ | ८.५७२ | ७७ | ५.४४३ |
| ३६ | ९.१३६ | ५७ | ८.५१२ | ७८ | ५.२२९ |
| ३७ | ९.१२६ | ५८ | ८.४४६ | ७९ | ५.०१८ |
| ३८ | ९.११६ | ५९ | ८.३७१ | ८० | ४.८१२ |
| ३९ | ९.१०३ | ६० | ८.२८७ | ८१ | ४.६११ |
| ४० | ९.०९० | ६१ | ८.१९४ | | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नितीन गद्रे**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st November 2021.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. MSC-2019/C.R.451/SER-4.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (Commutation of Pension) (Amendment) Rules, 2021.

2. In rule 3 of the Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984 (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub-rule (*1*),—

(*a*) in clause (*a*), after the words "Auditor General of India" the words "or Director, Accounts and Treasury" shall be added and shall always be deemed to have been added;

(*b*) in clause (*d*), -

(*i*) sub-clause (*i*) shall be deleted;

(*ii*) in sub-clause (*ii*), the words "including sub-treasury," shall be deleted.

3. In rule 5 of the principal Rules,—

(*a*) in sub–rule (1), for the words "one-third" the words "forty per cent." shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 27th February 2009 ;

(*b*) Following Note be inserted after sub-rule (1).—

Note – However, this entitlement would be optional.

(*c*) in sub–rule (2), for the words "one-third" the words "forty per cent." shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 27th February 2009.

4. After rule 8 of the principal Rules, the following rule shall be added and shall be deemed to have been added with effect from the 30th May 1988, namely:—

(A) "*8A. Restoration of commuted portion of Pension*.—

(1) (*a*) In cases, where Government Servant who has commuted a portion of his pension on the 1st April 1985 or thereafter, his pension shall be restored after completion of fifteen years of his retirement.

(*b*) In cases, where a Government Servant commuted a portion of his pension and completed fifteen years before the 1st April 1985, his pension shall be restored with effect from the 1st April 1985.

(2) Each pensioner, who is eligible to get the commuted portion of his pension restored under sub-rule (1) above shall apply in the Form-F duly completed, to the Pension Disbursing Authority.

(3) In cases, where the pensioner has completed fifteen years from the date of retirement on the 1st April 1985 or thereafter and had died subsequently, his legal heirs are also entitled to receive arrears with effect from the 1st April 1985 or from date of completion of fifteen years from the date of retirement whichever is later, till the date of the pensioner's death. For this purpose, legal heirs may also apply to the Pension Disbursing Authority.

(4) In the cases, where the pension payment order does not contain information regarding commuted portion, the Pension Disbursing Authority shall obtain the information from the Accounts Officer who had issued the pension payment order.

(5) The Pension Disbursing Authority shall intimate to the Accounts Officer, who had issued the pension payment order, the full particulars of each pension case alongwith the amount of pension restored for verifying its correctness in the Form G.

(6) The State Government employees, who had absorbed under Public Sector Undertaking, Autonomous Bodies, Local Bodies, etc. and have received or opted to receive commuted value for one third of pension as well as terminal benefits equal to the commuted value of the balance amount of pension after commuting one third of pension, are not entitled to any benefit under these provisions as they have ceased to be State Government Pensioners.";

(B) In rule 8A as so added,—

(*i*) in sub-rule (1), after the clause (*b*), the following *Explanation* shall be inserted and shall be deemed to have been inserted with effect from the 28th March 1990, namely:—

"*Explanation*.—In cases, where a Government Servant commuted the portion of pension after the date of retirement, his pension shall be restored after completion of fifteen years from the date of commutation of pension.";

(*ii*) sub-rule (2) shall be deleted and shall be deemed to have been deleted with effect from 2nd July 2015;

(*iii*) sub-rule (6) shall be deleted and shall be deemed to have been deleted with effect from 26th May 1997.

5. After rule 8A of the principal Rules, the following rule shall be added and shall be deemed to have been added with effect from 26th May 1997, namely:—

"*8B. Revision of the restored amount of one-third commuted portion of pension in respect of the State Government employees who had drawn lumpsum amount on their absorption in a Public Sector Undertaking or Autonomous Body or Local Body*.– The cases of the revision of the restored amount of one-third commuted portion of pension of absorbed Government employees, who had drawn lumpsum amount on absorption, in a Public Sector Undertaking or Autonomous Body or Local Body shall be regulated as per the Government Resolution issued by Government in this regard, from time to time.".

6. In rule 9 of the principal Rules, in sub-rule (*3*),–

(*i*) in clause (*a*), for the words "one hundred rupees" wherever it occurs, the words "ten per cent. of basic pension" shall be substituted;

(*ii*) in clause (*b*), for the words "one hundred rupees" or "rupees one hundred" wherever it occurs, the words "ten per cent. of basic pension" shall be substituted.

7. In Rule 10 of the principal Rules,—

(*a*) before the existing proviso, the following proviso shall be inserted and shall be deemed to have been inserted with effect from 11th March 1994, namely:—

"Provided that, if a pensioner has specifically mentioned the amount of commutation of his final pension in his application of commutation of pension and as a result of Government decision his final pension has been revised and enhanced retrospectively, if the pensioner expresses his willingness, he is entitled to revised and enhanced amount of commutation of his final pension upto one-third of revised final pension:";

(*b*) in the proviso as so added, for the words "one-third" the words "forty per cent." shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 27th February 2009;

(*c*) after the proviso as so inserted the following proviso shall be added, namely :–

Provided further that, as per revised Pay Commission Order, the Government has changed the pay scale and pension has been revised and enhanced retrospectively, the

pensioner may opt for difference of commutation, and he may submit the application to the concerned authority for the same within six months from the date of order issued by the Government. If the pensioner does not apply or opt for the difference it is presumed that he is not interested for revised commutation.

(*d*) in the existing proviso,–

(*i*) for the words "Provided that" the words "Provided also that" shall be substituted;

(*ii*) for the words "rupees one hundred" or "one hundred rupees" wherever it occurs, the words "ten per cent. of basic pension" shall be substituted.

8. In rule 13 of the principal Rules, in sub-rule (*3*),—

(*i*) for the words "pension papers prior to" the words "pension papers up to" shall be substituted ;

(*ii*) in the proviso,—

(*a*) for clause (*c*) the following shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from 3rd March 1990, namely:—

"(c) no such application of commutation of pension received after period specified in clause (*b*) shall be rejected on the ground of not received it in time and if such application of commutation of pension is received by the Head of office on or before the date of retirement of Government servant, the commutation of pension shall become absolute on the next day of his retirement.".

(*b*) clause (*b*) and clause (*c*) as so substituted shall be deleted.

9. In rule 20 of the principal Rules, in sub-rule (*1*), in clause (*b*), after the word "the request" the words "to the Audit Officer" shall be substituted.

10. In rule 22 of the principal Rules, sub-rule (*1*), in clause (*b*), for the words "one hundred rupees" the words "ten per cent. of basic pension" shall be substituted.

11. In rule 25 of the principal Rules, in sub-rule (*1*), in clause (*b*), for the word "subject" the word "send" shall be substituted.

12. In rule 31 of the principal Rules, in sub-rule (*1*), in the proviso, for the words "one hundred rupees" wherever it occurs, the words "ten per cent. of basic pension" shall be substituted.

13. In Form A appended to the principal Rules,—

(*a*) in Part-I,

(*i*) in serial No.11,–

(*a*) in clause (*a*) the words "/ Sub-Treasury" shall be deleted;

(*b*) clause (*b*) shall be deleted;

(*ii*) in the Note, for the words "one-third" the words "forty per cent." shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 27th February 2009;

(*b*) In part III, in para 4, the figures "266" shall be deleted.

14. In Form B appended to the principal Rules,

(*a*) In the bracket mentioned below the title, the sentence is deleted.

(*b*) in Part-I,

(*i*) in serial no.8,–

(*a*) in clause (*a*) the words "/ Sub-treasury" shall be deleted;

(*b*) clause (*b*) shall be deleted;

(*ii*) in the Note, for the words "one-third" the words "forty per cent." shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 27th February 2009;

(*c*) In part III, in para 4, the figures "266" shall be deleted.

15. In Form C appended to the principal Rules,—

(*a*) in Part-I,

(*i*) in serial No.11,—

(*a*) in clause (*a*), the words "/ Sub-treasury" at both the places, shall be deleted;

(*b*) clause (*b*), shall be deleted ;

(*ii*) in the Note, for the words "one-third" the words "forty per cent." shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 27th February 2009.

(*b*) In part IV, at serial No. 8, for the figures and words "266-Pension and Other Retirement Benefits-B-Commuted Value of Pensions" the words "Mention Proper Budget Head Here" shall be substituted.

16. In Form E, in Part I, after the words "here enter the" the words "name of" shall be inserted.

17. Form F appended to the principal Rules shall be deleted with effect from 2nd July 2015.

18. After Form F, the following form shall be added and shall be deemed to have been added with effect from the 1st April 1985, namely :–

**"FORM—G**

(*See Rule 8A(5)*)

Form of Intimation by the Pension Disbursing Authority to the Pension Payment Order Issuing Authority regarding restoration of Commuted Portion of Pension.

(Particulars of Pension Disbursing Authority)

1. Name of Pensioner : ..........................................................
2. Date of Retirement : ..........................................................
3. Pension Payment Order No. : ..........................................................
4. Amount of Original Pension : ..........................................................
5. Amount of Pension Commuted : ......................................................
6. Amount of Pension restored : ..........................................................
7. Effective Date of restoration : .........................................................
8. Amount of Pension after restoration : ...............................................
9. Additional remarks, if any : .........................................................

(Signature of Office-in-charge)
Pay and Accounts Officer, Mumbai /
Treasury Officer.

To,

The Accountant General (A & E)-I, Maharashtra, Mumbai.

The Accountant General (A & E)-II, Maharashtra, Nagpur.".

19. The existing table to the principal Rules shall be renamed as "TABLE-I" and after TABLE-I as so renamed, the following Table shall be added, namely:—

"TABLE-II

[*See rules 8 (1); 26 (7); 28 (5) and 29 (1) & (2)*]

(applicable from the 27th February 2009)

**Commutation value for a pension of rupee 1 per annum**

**Basic Formula: Basic Pension x 40% x 12 x commutation value at age next birthday based on the date of original application of Government servant.**

| Age next birthday | Commutation Value expressed as number of year's purchase | Age next birthday | Commutation Value expressed as number of year's purchase | Age next birthday | Commutation Value expressed as number of year's purchase |
|---|---|---|---|---|---|
| 20 | 9.19 | 41 | 9.075 | 62 | 8.093 |
| 21 | 9.187 | 42 | 9.059 | 63 | 7.982 |
| 22 | 9.186 | 43 | 9.040 | 64 | 7.862 |
| 23 | 9.185 | 44 | 9.019 | 65 | 7.731 |
| 24 | 9.184 | 45 | 8.996 | 66 | 7.591 |
| 25 | 9.183 | 46 | 8.971 | 67 | 7.431 |
| 26 | 9.182 | 47 | 8.943 | 68 | 7.262 |
| 27 | 9.180 | 48 | 8.913 | 69 | 7.083 |
| 28 | 9.178 | 49 | 8.881 | 70 | 6.897 |
| 29 | 9.176 | 50 | 8.846 | 71 | 6.703 |
| 30 | 9.173 | 51 | 8.808 | 72 | 6.502 |
| 31 | 9.169 | 52 | 8.708 | 73 | 6.296 |
| 32 | 9.164 | 53 | 8.724 | 74 | 6.085 |
| 33 | 9.159 | 54 | 8.678 | 75 | 5.872 |
| 34 | 9.152 | 55 | 8.627 | 76 | 5.057 |
| 35 | 9.145 | 56 | 8.572 | 77 | 5.443 |
| 36 | 9.136 | 57 | 8.512 | 78 | 5.229 |
| 37 | 9.126 | 58 | 8.446 | 79 | 5.018 |
| 38 | 9.116 | 59 | 8.371 | 80 | 4.812 |
| 39 | 9.103 | 60 | 8.287 | 81 | 4.611 |
| 40 | 9.090 | 61 | 8.194 | | .". |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NITIN GADRE,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.